सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/१०६९ दिनांक : २३/०२/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

विषय : भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त ''संविधान गौरव महोत्सव'' अंतर्गत फेब्रुवारी, २०२५ मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत...

संदर्भ क्र : १. जा. क्र. ससं/उशि/पुवि/संकिर्ण/परिपत्रक/४२०३८१२/२०२५/ दि. १३.०२.२०२५
२. क्र. उशिसं/मवि–१/संविधान गौरव महोत्सव/ई –१०४२८५८, दि. १२/०२/२०२५

महोदय/महोदया,

दि. २६ जानेवारी १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्यात आला, या घटनेला दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. दि. २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर **''संविधान गौरव महोत्सव''** साजरा करणे संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे. सदरील संविधान गौरव महोत्सव विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात यावा.

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे आणि सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचे निर्देशानुसार संदर्भ क्र. १ अन्वये भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. संदर्भ क्र. २ अन्वये संविधान गौरव महोत्सवाअंतर्गत एका नामवंत तज्ञ व्यक्ती/विषयतज्ञ यांना निमंत्रित करून व्यापक स्वरूपात व्याख्यानाचे आयोजन करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

शासन निर्देशानुसार आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये संविधान महोत्सव व त्याअंतर्गत नामवंत तज्ञ व्यक्ती/विषयतज्ञ यांच्या व्याख्यानाचे आयोजन करणेबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी,

१. मा. प्राचार्य डॉ. बी.जी. चौगुले, श्री शिवाजी मराठा सोसायटीचे, अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे
२. मा. प्राचार्य डॉ. पी.एन. शेळके, पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघीरे महाविद्यालय, सासवड, पुणे
३. मा. प्राचार्य. डॉ. एस.जी. सुर्यवंशी, श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे, श्री. छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, श्रीगोंदा, अहिल्यानगर
४. मा. प्राचार्य. डॉ. डी.एन. शिंपी, श्री. नेमीनाथ जैन बह्मचार्याश्रम (जैन गुरूकुल) संचालित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला व वाणिज्य महाविद्यालय, नेमीनगर, चांदवड, नाशिक

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 1220
दिनांक : 14.02.2025
जावक दिनांक : 17.02.2025
विभाग : BSD

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे 411 001

Web-www.jdhepune.info E-mail:jdhepune@gmail.com
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/संकिर्ण/परिपत्रक/ 4203812/2025/ दि. 13.02.2025

विद्यार्थी विकास
आवक क्र. 1811
17 FEB 2025
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत/स्वायत्त विद्यापीठे,
**पुणे विभाग. पुणे.**

**विषय : भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, 2025 मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

**(सर्व विद्यापीठांनी या महोत्सवाअंतर्गत एका नामवंत तज्ञ व्यक्ती/ विषयतज्ञ यांना निमंत्रित करुन व्याख्यानाचे आयोजन करणेबाबत.** )

संदर्भ : 1. मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), म.रा. पुणे यांचेकडील पत्र क्र. उशिसं/मवि-1/संविधान गौरव महोत्सव/2025/356 अ, दि. 03 फेब्रुवारी, 2025.

2. मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), म.रा. पुणे यांचेकडील पत्र क्र. उशिसं/मवि-1/संविधान गौरव महोत्सव/2025/ई-1042858, दि. 12 फेब्रुवारी, 2025.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये सादर करण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), म.रा. पुणे यांचेकडील पुणे यांचेकडील दोन्ही पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

संदर्भ क्र. 01 अन्वये भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त **"संविधान गौरव महोत्सव"** अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, 2025 मध्ये संपूर्ण महिनाभर विविधउपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भ क्र. 02 अन्वये सर्व विद्यापीठांनी या महोत्सवाअंतर्गत एका नामवंत तज्ञ व्यक्ती/विषयतज्ञ यांना निमंत्रित करुन विद्यापीठ स्तरावर व्यापक स्वरुपात व्याख्यानाचे आयोजन करावे. सदर व्याख्यानात विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्य, अध्यापक, विद्यार्थी, पालक व सर्व सामान्य नागरिक यांनाही निमंत्रित करावे. व्याख्यानाच्या आयोजनास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. सदर उपक्रमाचे अयोजन दि. 28 फेब्रुवारी 2025 पूर्वी करण्यात यावी. असे नमूद केले आहे. त्यानुसार या विभागातील सर्व अकृषी/अभिमत/स्वायत्त विद्यापीठे आपल्यास्तरावरुन सदर व्याख्यानाचे अयोजन करावे.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 14-02-2025 13:25:50

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे-1

**प्रत** : मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-411 016

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/मवि-१/ संविधान गौरव महोत्सव/ई-१०४२८५८ दि. १२ फेब्रुवारी, २०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण . महाराष्ट्र राज्य

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

**विषय:- भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांत फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ** :- संचालनालयाचे परिपत्रक क्र. उशिसं/मवि-१/संविधान गौरव महोत्सव/२०२५, दि. ३ फेब्रुवारी २०२५

उपरोक्त विषयी दि. २६ जानेवारी १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्यात आला, या घटनेला दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन दिनांक २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर **संविधान गौरव महोत्सव** साजरा करणे संदर्भात संदर्भिय परिपत्रकाद्वारे सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना सूचित करण्यात आले आहे.

याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदरील **संविधान गौरव महोत्सव** विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात यावा.

सर्व विद्यापीठांनी या महोत्सवाअंतर्गत एका नामवंत तज्ञ व्यक्ती / विषयतज्ञ यांना निमंत्रित करुन विद्यापीठ स्तरावर व्यापक स्वरुपात व्याख्यानाचे आयोजन करावे. सदर व्याख्यानात विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्य, अध्यापक, विद्यार्थी, पालक व सर्व सामान्य नागरीक यांनाही निमंत्रित करावे. व्याख्यानाच्या आयोजनास व्यापक प्रासिध्दी देण्यात यावी. सदर उपक्रमाचे आयोजन दि. २८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी करण्यात यावे.

संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यापीठासमावेत संपर्क करुन सदर व्याख्यान आयोजनाचे नियोजन करावे. तसेच आपल्या अधिनस्त महाविद्यालये / संस्थांना सदर व्याख्यानाच्या दिनांक, वेळ व ठिकाण आपल्या स्तरावरुन कळवावा.

निमंत्रित करण्यात आलेल्या तज्ञ व्यक्ती / विषयतज्ञ यांचे मानधन, दैनिक भत्ता व प्रवास खर्च संबंधित विद्यापीठाच्या विद्यापीठ निधीतून नियमानूसार अदा करण्याची कार्यवाही विद्यापीठांनी करावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 12-02-2025 18:31:06

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२१११


क्र.: उशिसं/मवि-१/ संविधान गौरव महोत्सव/ २०२५/ ३५६ अ दि. ०३ फेब्रुवारी, २०२५

### परिपत्रक

**विषय:- भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त " संविधान गौरव महोत्सव " अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसुदा स्विकारण्यात आला, या घटनेला २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करणे औचित्याचे ठरेल. या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणे आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, शहरी/ ग्रामीण/ आदिवासी भागातील सर्व सामान्य नागरिक/ नागरिकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार या बाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्व सामान्यापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव अंतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

- " भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे.
- भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/ भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे.
- राज्य घटनेच्या विविध बाबीं संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करणे.
- महाविद्यालयांमध्ये राज्य घटनेविषयीचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.

- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व सामान्यांपर्यंत राज्यघटना पोहोचवावी या करिता जनजागृती अभियान राबविणे.
- राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राज्यघटने विषयी व्याख्याने आयोजित करणे.

उपरोक्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत उपक्रमांच्या आयोजनाबाबतचा अहवाल आपल्या स्तरावर एकत्रित करून पीडीएफ स्वरुपात व हार्डकॉपी स्वरुपात (एकूण ०३ प्रती - कलर प्रिंटस) संचालनालयास सादर कराव्यात.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालय स्तरावर डॉ. प्रशांत मगर (मो. नं. -८७६६७०५३१५) हे समन्वयक म्हणून काम पाहतील.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक ( उच्च शिक्षण )

प्रत- मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे 411 001

Web-www.jdhepune.info E-mail:jdhepune@gmail.com
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/संकिर्ण/परिपत्रक/2025/4182983 दि.

प्रति,

1. कुलसचिव, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे.
2. कुलसचिव, सर्व विद्यापीठ, पुणे विभाग,
3. प्राचार्य/प्राचार्या,
   सर्व अशासकीय अनुदानित/कायम विाअनुदानित कला वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
   पुणे विभाग.

**विषय : भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्षपूर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, 2025 मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

संदर्भ : 1. मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), म.रा. पुणे यांचेकडील पत्र क्र. उशिसं/मवि-1/संविधान गौरव महोत्सव/2025/356 अ, दि. 03 फेब्रुवारी, 2025.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये सादर करण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), म.रा. पुणे यांचेकडील पुणे यांचेकडील पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त विषयी 26 नोव्हेंबर, 1949 रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसुदा स्विकारण्यात आला या घटनेला 26 नोव्हेंबर, 2024 रोजी 75 वर्ष पूर्ण झाली आहेत. 26 जानेवारी, 1950 रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन 26 जानेवारी, 2025 रोजी या ऐतिहासिक घटनेस 75 वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभोम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, 2025 मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करणे औचित्याचे ठरेल. या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणे आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, शहरी/ग्रामीण/आदिवासी भागातील सर्व सामान्य नागरिक/नागरिकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार या बाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्व सामान्यापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने आपल्या विभागातील विद्यापीठेमध्ये व महाविद्यालयात फेब्रुवारी, 2025 मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव अंतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

- "भारतीय राज्यघटनेची ओळख" या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे.
- भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे.
- राज्यघटनेच्या विविध बाबी संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करणे.

- विद्यापीठामध्ये व महाविद्यालयांमध्ये राज्य घटनेविषयाचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करुन त्यांची व्याख्याने अयोजित करावी.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यामातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व राज्यघटना पोहोचवावी या करिता जनजागृती अभियान राबवावा.
- राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राज्यघटने विषयी व्याख्याने आयोजित करणे.

**या अनुषंगाने खालील जिल्हानिहाय प्राचार्य व समन्वकांची नियुक्ती करण्यात येते आहे.**

| क्र. | जिल्हा | महाविद्यालय | प्राचार्याचे नाव | समन्वयकाचे नाव | समन्वयाचा मोबईल नंबर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | पुणे शहर | अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर, पुणे | डॉ. बी.जी.चौगुले | - | 98503 50228 |
| | | | | डॉ. शुभांगी कुऱ्हाडे | 98508 04088 |
| | | | | श्री. सुनील कोळेकर | 98818 80205 |
| 02 | पुणे ग्रामिण | वाघीरे महाविद्यालय सासवड, पुणे | डॉ. पी. एन. शेळके | - | 85529 17007 |
| | | | | प्रा. नितीन लगड | 98504 43731 |
| | | | | प्रा. दीपक उजागरे | 99707 76050 |
| 03 | अहमदनगर | छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा, अहमदनगर | डॉ. एस. जी. सूर्यवंशी | - | 86059 20505 |
| | | | | डॉ. संदीप अंभग | 97661 21623 |
| 04 | नाशिक | के.के.एच.आबड कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदवड, नाशिक | डॉ. डी. एन. शिंपी | - | 96890 92092 |
| | | | | डॉ. चांदवडकर | 94229 43652 |

तरी उपरोक्त या विभागातील सर्व अकृषी/अभिमत/स्वायत्त विद्यापीठे व सर्व अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित कला वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांना सुचीत करण्यात येते की, संविधान गौरव महोत्सव अंतर्गत उपक्रमांच्या आयोजनबाबतचा एकत्रित अहवाल पीडीएफ स्वरुपात व हार्डकॉपी स्वरुपात ( एकूण 03 प्रती-कलर प्रिंटर्स ) सादर करण्यासाठी संबंधित जिल्हातील प्राचार्य व समन्वक यांच्याकडे संपर्क साधून त्यांच्याकडे सादर करण्यात यावा.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 12-02-2025 15:55:53

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे-1

प्रत : मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, 412 ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-411 016.यांना माहितास्तव सादर.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र.: उशिसं/मवि-१/ संविधान गौरव महोत्सव/ २०२५/ ३५६ अ दि. ०३ फेब्रुवारी, २०२५

### परिपत्रक

**विषय:- भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त " संविधान गौरव महोत्सव " अंतर्गत आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत.**

उपरोक्त विषयी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसुदा स्विकारण्यात आला, या घटनेला २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी, २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करणे औचित्याचे ठरेल. या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणे आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, शहरी/ ग्रामीण/ आदिवासी भागातील सर्व सामान्य नागरिक/ नागरिकांना भारतीय राज्यघटनेची नव्याने ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार या बाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्व सामान्यापर्यंत पोहोचविणे या उद्देशाने आपल्या अधिपत्याखालील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव अंतर्गत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

- " भारतीय राज्यघटनेची ओळख " या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धांचे आयोजन करणे.
- भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटनेसंदर्भात पोस्टर/ भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे.
- राज्य घटनेच्या विविध बाबीं संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करणे.
- महाविद्यालयांमध्ये राज्य घटनेविषयीचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.

- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व सामान्यांपर्यंत राज्यघटना पोहोचवावी या करिता जनजागृती अभियान राबविणे.
- राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राज्यघटने विषयी व्याख्याने आयोजित करणे.

उपरोक्त संविधान गौरव महोत्सव अंतर्गत उपक्रमांच्या आयोजनाबाबतचा अहवाल आपल्या स्तरावर एकत्रित करून पीडीएफ स्वरुपात व हार्डकॉपी स्वरुपात (एकूण ०३ प्रती - कलर प्रिंटस) संचालनालयास सादर कराव्यात.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालय स्तरावर डॉ. प्रशांत मगर (मो. नं. -८७६६७०५३१५) हे समन्वयक म्हणून काम पाहतील.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक ( उच्च शिक्षण )

प्रत- मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई